| | | | | |
|---|---|---|---|---|
| **MHAK090016742022**<br>DISTRICT COURTS MAHARASHTRA<br>सत्यमेव जयते | | | | |
| दाखल तारिख | : | ०६ | १० | २०२२ |
| नोंदणी तारिख | : | ०६ | १० | २०२२ |
| निकाल तारिख | : | ०६ | ०५ | २०२५ |
| कालावधी | : | **०२** | **०७** | **००** |
| | | **वर्ष** | **म.** | **दिवस** |

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (न्यायालय क्र.२), मुर्तिजापूर यांचे न्यायालयात**

**( पिठासीन अधिकारी आर.आर.पकडे )**

प्रथम खबर क्र. २२५/२०२२, पोलीस ठाणे माना, जि. अकोला
महाराष्ट्र दारू बंदी कायदा कलम ६५ (ई)

**<u>सं.फौ.प्र.क्र. ८४१/२०२२</u>** **<u>निशाणी क्रमांक—१७</u>**

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | : | महाराष्ट्र शासन मार्फत पोलीस ठाणे अधिकारी पोलीस ठाणे माना, |
| शासनातर्फे सरकारी वकील | : | श्री आर. एस. पाटील, सहायक सरकारी अधिवक्ता |
| आरोपी | : | **राजु काशीनाथ सोळंके,**<br>वय — ४२ वर्षे, धंदा —मजुरी,<br>रा. सोनोरी, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला. |
| मार्फत | : | विधिज्ञ श्री. एन. बी. सुसतकर |

| | |
|---|---|
| अपराधाची तारीख | १५.०९.२०२२ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | १५.०९.२०२२ |
| दोषारोपपत्राची तारीख | ०६.१०.२०२२ |
| गुन्हाचा तपशीलाची तारीख | २१.१०.२०२४ |
| पुरावे नोंदविल्याची तारीख | १७.०२.२०२५ |
| न्यायनिर्णयाकरिता ठेवल्याची तारीख | ०६.०५.२०२५ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०६.०५.२०२५ |
| शिक्षा ठोठावल्याची तारीख, (शिक्षा दिली असेल तर) | ... निरंक .... |

## आरोपींचे वर्णन

| श्रेणी / अ.क्र. | आरोपींची नावे | अटकेची तारिख | जमानतवर सोडल्याची तारिख | ठेवलेले आरोप | शिक्षा दिली अथवा निर्दोष सोडले | ठोठावलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अंतर्गसाठी प्रकरण प्रलंबित असतांना तुरूंगात घालवलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **राजु काशीनाथ सोळंके**, | समजपत्रावर सोडले | — | महा. प्रोव्ही ॲक्ट ६५ (ई) | निर्दोष सोडण्यात आल | .... | ..... |

## सरकार पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयाचे साक्षीदारांची यादी

**अ. सरकार पक्ष**

| श्रेणी / अ.क्र. | साक्षीदार | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार/पोलीस /तज्ञ / पंच / वैद्यकिय / व इतर साक्षीदार |
|---|---|---|
| सा.क्र.१ | सलिम शाह बाबा शाह, नि.११ | घटनास्थळ व जप्ती पंच साक्षीदार |
| सा.क्र.२ | सोपान उध्धव काळे, नि.१४ | घटनास्थळ व जप्ती पंच साक्षीदार |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार (असल्यास):—**

| श्रेणी / अ.क्र. | नावे | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार/पोलीस /तज्ञ / पंच / वैद्यकिय / व इतर साक्षीदार |
|---|---|---|
| बचाव पक्षाचे वतीने कोणताही साक्षीदार तपासण्यात आला नाही. | | |

**क. न्यायालयाचे साक्षीदार (असल्यास):—**

| श्रेणी / अ.क्र. | सा. ची नावे | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार/पोलीस /तज्ञ / पंच / वैद्यकिय / व इतर साक्षीदार |
|---|---|---|
| न्यायालयाच्या वतीने कोणताही साक्षीदार तपासण्यात आला नाही. | | |

## सरकार पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयाचे निशाणी यांची यादी:

**अ. सरकारी साक्षीदार यांचे निशाणी बाबत:—**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | निशाणी बाबतचे वर्णन |
|---|---|---|
| १. | नि.क्र. १२ व १३, सा.क्र. १ | घटनास्थळ व जप्ती पंचनामा वरील सही |
| २. | नि.क्र. १५ व १६, सा.क्र. २ | घटनास्थळ व जप्ती पंचनामा वरील सही |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदारांचे निशाणी बाबतः—**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | निशाणी बाबतचे वर्णन |
|---|---|---|
| —निरंक— | | |

**क. न्यायालयाचे साक्षीदारांचे निशाणी बाबतः—**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | निशाणी बाबतचे वर्णन |
|---|---|---|
| १ | नि.१० | तपशिल व प्ली |

**ड. जड वस्तु निशाणी क्र.**

| अ.क्र. | महत्वाची वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| —निरंक— | | |

## न्या य नि र्ण य

(जाहीर दिनांक - ०६.०५.२०२५)

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारूबंदी कायदयाचे कलम ६५ (ई) अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून त्याचे विरूध्द सदर खटला चालविण्यात आलेला आहे.

०२. अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात अशी की, दिनांक १५.०९.२०२२ रोजी पोहेकॉ पंजाब इंगळे ब.नं.९८९ पो.स्टे. माना सोबत पो.कॉ. १४१९ असे विभागीय कोंबीग ऑपरेशन दरम्यान शेलु बीट मध्ये प्रो रेड कामी गेले असता, ग्राम सोनोरी गावात जि.प. शाळे जवळ गुप्त बातमीदाराकडुन बातमी मिळाली की, ग्राम सोनोरी येथे राहणारा राजु सोळंके हा त्याचे राहते घरी देशी दारूचे कॉर्टर बाळगुन त्याची विक्री करीत आहे, अशी खात्रीलायक बातमी मिळाल्याने जप्ती पंचनाम्यातील नमुद पंचांना बोलावुन माहिती दिली व पंच, सोबत पो. स्टाफ पोका १४१९ असे ग्राम सोनोरी येथील राजु सोळंके याचे उत्तर मुखी घरी जावुन आवाज दिला असता, तो घरी हजर मिळून आला त्याला त्याचे घराची देशी दारू बाबत झडती घेण्याचे कारण सागितले असता, त्याने संमती दर्शविल्याने त्याचे घरामध्ये स्वयंपाक खोलीचे दक्षिण भिंती जवळ एक नायलान थैली मध्ये ११ नग देशी दारूने भरलेले सिलबंद कॉर्टर प्रत्येकी १८० एम.एल. मापाचे पंचासमक्ष मिळून आले. त्याबाबत त्यास देशी दारू बाळगण्याबाबत परवाना विचारला असता, त्याने नकार दिल्यावरून सदर इसमास

पंचासमक्ष त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव राजु काशीनाथ सोळंके, वय ४२ वर्षे, रा. सोनोरी असे सांगितले. खात्री पटल्याने सदरचे ११ नग देशी दारूचे सिलबंद कॉर्टर प्रत्येकी १८० एम.एल. चे किंमत अंदाजे रू.६६०/— चे पंचासमक्ष जप्त पंचनाम्याप्रमाणे आरोपी राजु याचेकडून जप्त करून ताब्यात घेतले व जप्त केलेल्या देशी दारू कॉर्टर मधुन एक सीलबंद देशी दारू कॉर्टर १८० एम.एल. चे सीए तपासणी करीता सी.ए. सॅम्पल म्हणुन वेगळे काढुन त्यावर पंच, पो. स्टाफ व आरोपीचे सहीचे कागदी लेबल लावून घटनास्थळीच लाखेचे सील केले व सी.ए. सॅम्पल राखुन ठेवले. आरोपीचे हे कृत्य कलम ६५ई महा. दारूबंदी कायद्यान्वये होत असल्याने आरोपीविरूद्ध गुन्हा दाखल होण्यास विनंती करिता पोलीस स्टेशन माना येथे कायदेशिर फिर्याद दाखल केली.

**०३.** तपासी अंमलदार पो.कॉ. पंजाब सदुजी इंगळे ब.नं. ९८९ पो. स्टे. माना यांनी गुन्ह्याचा तपास केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासाअंती पुरेसा पुरावा मिळून आल्यामुळे आरोपीवरूध्द दोषारोपपत्र सादर केले.

**०४.** आरोपीविरुध्द निशाणी १० वर गुन्हयाचा तपशील निश्चित केला. आरोपीने गुन्हा नाकबुल केला व संपरिक्षा करण्याची विनंती केली. नि.क्र. १ वर आदेश पारित करण्यात आला व आरोपीविरुध्द कोणत्याही प्रकाराचा पुरावा अभिलेखावर न आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आले नाही.

**०५.** सदरचा खटला निकाली काढण्यासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहे व त्या मुद्दयाची निष्कर्ष मी त्याच्या समोर खालील कारणमिमांसा वरून देत आहे:—

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने हे सिध्द केले आहे का की, दिनांक १५.०९.२०२२ रोजी सोनोरी, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला येथे आरोपी देशी दारूचे प्रत्येकी १८० मि.ली. चे ११ क्वॉटर अवैधरित्या विनापरवाना विक्रीसाठी बाळगतांना मिळुन आला व त्याअर्थी आरोपीने महाराष्ट्र दारूबंदी कायदयाच्या कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केला? | **..नाही.** |
| २ | काय आदेश? | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.** |

## कारणमिमांसा

०६. आरोपीवरील आरोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने दोन साक्षीदार तपासले. अभियोग पक्षाचे इतर साक्षीदारांना वारंवार समन्स पाठवूनही हजर झाले नाही. त्यामुळे निशाणी क्र.१ वर आदेश पारित करुन पुरावा बंद केला.

०७. निशाणी क्रं १ वर आदेशानुसार फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ (१) (ब) नुसार आरोपीचे निवेदन घेण्यात आले नाही.

**मुद्दा क्र.१ करीता :—**

०८. आरोपीविरूध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने दोन साक्षीदार तपासले आहे. साक्षीदार क्र. १ सलिम शाह बाब शाह व सा. क्र. २ सोपान उध्धव काळे यांनी त्यांच्या साक्षीत कथन केले की, दि.१५.०९.२०२२ रोजी पोलिसांनी त्यांना पंचनाम्यासाठी आरोपीच्या रहत्या घरी गाम सोनोरी बोलाविले नव्हते व त्यांच्या समक्ष पोलीसांनी कोणताही पंचनामा तयार केला नाही. घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरी त्यांची सही मान्य केली, परंतु मजकुर मात्र नाकबुल केला. साक्षीदार फितुर ठरल्याने अभियोग पक्षाद्वारा साक्षीदाराचा उलटतपास घेतला असता, अभियोग पक्ष साक्षीदाराच्या मुखातुन कुठलीही महत्वाची स्विकृती वदवु शकला नाही.

०९. सदर कामी अभियोग पक्षाने जप्त मुद्देमालाचा सी.ए. अहवाल पुरेशी संधी असतांनाही अभिलेखावर दाखल केलेला नाही. घटनास्थळ व जप्ती पंचांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे घटनास्थळावरून जप्त केलेला मुद्देमाल ही देशी दारू होती ही बाब सिध्द होत नाही.

१०. आरोपीविरूध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाला आरोपीच्या ताब्यात अवैधरित्या दारू असल्याचे सिध्द करणे जरूरीचे आहे. अभियोग पक्षास रासायनिक विश्लेषण अहवालाद्वारे आरोपीकडुन जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा दारूच असल्याचे सिध्द करणे जरूरीचे आहे. जप्त केलेला मुद्देमाल आणि विश्लेषीत मुद्देमाल यांचा संबंध सुध्दा प्रस्थापित करणे आवश्यक आहे. जप्त केलेल्या देशी दारूपैकी एक सीलबंद देशी दारू कॉर्टर १८० एम.एल. वेगळे काढुन नमुना म्हणुन रासायनिक विश्लेषण अहवाल प्राप्ती करीता पाठविण्यात आल्याचे सिध्द करणे आवश्यक आहे. सदरहु प्रकरणात अभियोग पक्षास संधी देवुनही रासायनिक विश्लेषण

अहवाल न्यायालयास प्राप्त झाला नाही. इतर आवश्यक गोष्टी सुध्दा न्यायालयासमक्ष सिध्द झालेल्या नाहीत. तसेच तपासण्यात आलेला पंच साक्षीदार याने सुध्दा अभियोग पक्षाच्या हकिकतीस दुजोरा दिला नाही. करीता अभियोग पक्ष, आरोपीच्या ११ नग देशी दारूचे सिलबंद कॉर्टर प्रत्येकी १८० एम.एल. चे किंमत अंदाजे रू.६६०/— अवैधरित्या बाळगुन असल्याचे सिध्द करू शकला नाही. करीता मुद्दा क्रमांक १ यास नकारार्थी निष्कर्ष नोंदवुन मुद्दा क्रमांक २ संदर्भात खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | आरोपी **राजु काशीनाथ सोळंके** यांना महाराष्ट्र दारूबंदी कायद्याचे कलम ६५ (ई) खाली शिक्षापात्र अपराधातून फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम २५५ (१) नुसार निर्दोष सोडण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचे वैयक्तिक बंधनपत्र व जमानतपत्र रदद् करण्यात येत आहे. |
| ३. | प्रकरणातील जप्त ११ नग देशी दारूचे सिलबंद कॉर्टर अपील कालावधीनंतर निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क यांचेकडे पुढील विल्हेवाटीसाठी पाठवीण्यात याव्या. |
| ४. | आरोपीने फौजदारी प्रक्रीया संहितचे कलम ४३७—अ नुसार १५,०००/— रूपयाचा वैयक्तीक जातमुचलका दयावा. |

RADHARAMAN RAMDAS PAKADE
Digitally signed by RADHARAMAN RAMDAS PAKADE
Date: 2025.05.08 11:00:22 +0530

दिनांकः ०६.०५.२०२५.

( आर. आर. पकडे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२, मुर्तिजापूर.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | S. R. Adhau |
| Name of the Court | Jt. Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Murtizapur. |
| Date of Order & Judgment | 06.05.2025 |
| Order/Judgment Signed by the P.O. On | 06.05.2025 |
| Judgment/Order uploaded on | 08.05.2025 |